**सार्वजनिक आरोग्य विभाग,**
**गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत,**
**१० वा मजला, मंत्रालय, मुंबई ४०० ००१.**
**दिनांक : २९ सप्टेंबर, २०२१**

**अधिसूचना**

भारताचे संविधान.

क्रमांक: सेप्रनि २०१९ /आरोग्य पर्यवेक्षक /प्र.क्र.८०५/सेवा ५. भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन आणि याबाबतीत केलेले सर्व विद्यमान नियम, आदेश, निर्णय किंवा संलेख अधिक्रमण करुन महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील आरोग्य सेवा आयुक्तालयातील " आरोग्य पर्यवेक्षक, गट क " या पदाच्या सेवाप्रवेशाचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत.

१. महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील आरोग्य सेवा, आयुक्तालयातील "आरोग्य पर्यवेक्षक, गट क या पदाचे (सेवा प्रवेश) नियम २०२१" असे संबोधण्यात यावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर,

क) "परिमंडळ" याचा अर्थ,महाराष्ट्र शासनाच्या सावजनिक आरोग्य विभागाने प्रशासकिय प्रयोजनासाठी स्थापन केलेले जिल्हानिहाय गट, असा आहे ;

ख) "आयुक्तालय" याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाच्या सावर्जनिक आरोग्य विभागातंर्गत आरोग्य सेवा आयुक्तालय, असा आहे;

ग) "पदवी" याचा अर्थ, कोणत्याही सांविधानिक विद्यापिठाची पदवी, असा आहे;

घ) "विभाग" याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाचा सार्वजनिक आरोग्य विभाग,असा आहे.

ङ) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे;

च) "निवड समिती" याचा अर्थ, शासकिय सेवेतील गट क व गट ड च्या पदांवरील सरळसेवाभरती करिता उमेदवरांची निवड करण्याच्या प्रयोजनार्थ, शासनाने वेळोवेळी घटित केलेली समिती, असा आहे.

३. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील आरोग्य सेवा, आयुक्तालयातील "आरोग्य पर्यवेक्षक, गट क" या पदावरील नियुक्ती एकतर,-

क) आरोग्य निरिक्षक पदावरील किमान तीन वर्षे इतकी नियमित सेवा असणाऱ्या आणि पोटनियम (ग)च्या खंड (दोन) व (तीन) मध्ये विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या व्यक्तींमधून, योग्यतेस अधीन राहून, सेवाज्येष्ठतेच्या आधारावर पदोन्नतीद्वारे करण्यात येईल.

किंवा

ख) प्रयोगशाळा तंत्रज्ञ किंवा प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी या पदावरील किमान तीन वर्षे इतकी नियमित सेवा असणाऱ्या आणि पुढील अर्हता धारण करणाऱ्या,-

(एक) जे शासन मान्यता विद्यापीठातून मुख्य विषय रसायनशास्त्र किंवा जीवशास्त्र किंवा वनस्पतीशास्त्र किंवा प्राणिशास्त्र किंवा सूक्ष्मजीवशास्त्र किंवा जैवतंत्रज्ञान शास्त्र किंवा न्यायवैद्यक शास्त्र यासह विज्ञान शाखेची पदवी धारण करतील आणि शासन मान्यताप्राप्त संस्थेतून वैद्यकीय प्रयोगशाळा तंत्रज्ञ शास्त्रामध्ये पदव्युत्तर पदविका (डी.एम.एल.टी.) धारण केलेली असावी.

किंवा

जे परावैद्यक तंत्रज्ञान( प्रयोगशाळा तंत्रज्ञान) अथवा विज्ञान शाखेतील परावैद्यक तंत्रज्ञान( प्रयोगशाळा तंत्रज्ञान) ही पदवी धारण करतील.

(दोन) परिविक्षाधीन कालावधी दरम्यान सहा महिन्यांचा रुग्णालयीन अभ्यासक्रम प्रशिक्षण पूर्ण करुन उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

अशा व्यक्तींमधून, योग्यतेस अधीन राहून, सेवाज्येष्ठतेच्या आधारावर पदोन्नतीद्वारे करण्यात येईल.

किंवा

**(ग) पुढील व्यक्तींमधून जे,-**

(एक) अठरा वर्षांपेक्षा कमी वयाचे नाहीत आणि अडतीस वर्षापेक्षा अधिक वयाचे नाहीत; परंतु राखीव प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत, उच्च वयोमर्यादा पाच वर्षापर्यंत शिथिल करण्यात येईल.

(दोन) ज्यांनी मान्यताप्राप्त विद्यापीठाची विज्ञान शाखेतील पदवी धारण केली आहे आणि

(तीन) महाराष्ट्र शासनाच्या विभागीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र किंवा सार्वजनिक आरोग्य संस्था नागपूर यांच्याकडून आरोग्य कर्मचारी पदासाठी निश्चित केलेला निमवैदयकिय मुलभूत प्रशिक्षण अभ्यासक्रम किंवा आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने मान्यता दिलेल्या स्वच्छता निरिक्षक (सॅनिटरी इन्सपेक्टर) किंवा महाराष्ट्र

शासनाने मान्यता दिलेल्या स्वच्छता निरिक्षक (सॅनिटरी इन्सपेक्टर) किंवा समकक्ष अभ्यासक्रम पुर्ण करुन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

अशा उमेदवारांमधून निवड समितीने आयोजित केलेल्या स्पर्धात्मक परिक्षेच्या निकालाच्या आधारे नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल.

४. नियम ३ येथे नमूद केलेल्या पदांवरील नियुक्ती, आरोग्य निरिक्षक व प्रयोगशाळा तंत्रज्ञ किंवा प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी यांच्यामधून पदोन्नतीने व नामनिर्देशनाने अनुक्रमे ४०: ४०: २० याप्रमाणात करण्यात येईल.

५. नियम ३ येथे नमूद केलेल्या पदावर नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, मराठी भाषा व हिंदी भाषा परिक्षा, त्याबाबतीत केलेल्या नियमांनुसार, अगोदरच उत्तीर्ण केल्या नसतील अथवा त्या उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर, त्या उत्तीर्ण होणे आवश्यक असेल. सदर व्यक्ती, मराठी भाषा व हिंदी भाषा परिक्षा, उत्तीर्ण होईपर्यत अथवा सदर परिक्षा उत्तीर्ण होण्यातून सूट देण्यात येईपर्यंत वार्षिक वेतनवाढीस अथवा पदोन्नतीस पात्र असणार नाही.

६. नियम ३ येथे नमूद पदांवर पदोन्नतीने नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या नियमानुसार संगणक हाताळणी ज्ञान अर्हता प्रमाणपत्र विहित कालावधीत, त्यातून सूट देण्यात आली नसेल तर, धारण करणे आवश्यक राहील. अन्यथा सदर व्यक्ती, शासनाने त्याबाबतीत विहित केलेल्या नियमांनुसार संगणक हाताळणी ज्ञान अर्हता प्रमाणपत्र धारण करेपर्यंत किंवा त्यातून सूट देण्यात येईपर्यंत वार्षिक वेतनवाढीस किंवा पदोन्नतीस पात्र असणार नाही.

७. नियम ३ येथे नमूद केलेल्या पदांवर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त केलेली व्यक्ती, महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबांचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ यांच्या तरतूदीनुसार किंवा त्याबाबतीत, शासनाने वेळोवेळी केलेल्या इतर कोणत्याही नियमांनुसार, लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करील.

८. नियम ३ येथे नमूद केलेल्या पदावर नियुक्त केलेली व्यक्ती महाराष्ट्र राज्यात कोठेही बदलीस पात्र असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Pradeep Vyas

(डॉ. प्रदीप व्यास)

शासनाचे अप्पर मुख्य सचिव.

# NOTIFICATION

Public Health Department,
G.T. Hospital Complex Building,
$10^{th}$ floor, Mantralaya.
Mumbai - 400 001.
Dated the $29^{th}$ September, 2021.

Constitution of India.

No. RR 2019/Health Supervisor/CR 805/Seva 5.- In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India and in supersession of all existing rules, orders, resolutions or instruments made in this behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating recruitment to the posts of Health Supervisor Group-C in the Commissionarate of Health Services under the Public Health Department of the Government of Maharashtra, namely:-

**1.** These rules may be called the Health Supervisor Group-C in the Commissionarate of Health Services under the Public Health Department of the Government of Maharashtra (Recruitment) Rules, 2021.

**2.** In these rules, unless the context requires otherwise,-

*(a)* "Circle" means a District-wise group set up by the Public Health Department for the administrative purpose;

*(b)* "Commissionerate" means the Commissionerate of Health Services under the Public Health Department of Government of Maharashtra;

*(c)* "Degree" means the degree of any statutory University;

*(d)* "Department" means the Public Health Department of Government of Maharashtra;

*(e)* "Government" means the Government of Maharashtra;

*(f)* "Selection Committee" means a committee constituted by the Government from time to time for the purpose of selection of candidates for the direct recruitment to the post of Group-C and Group-D in the Government service.

**3.** Appointment to the post of Health Supervisor Group-C in the Commissionarate of Health Services under the Public Health Department shall be made either,-

*(1)* by promotion of a suitable person on the basis of seniority subject to fitness from amongst the persons having minimum three years regular service on the post of Health inspector and holding the qualification prescribed in clause (b) and (c) of sub-rule (3)

Or

*(2)* by promotion of a suitable person on the basis of seniority subject to fitness from amongst the persons having minimum three years regular service on the post of Laboratory Technician or Laboratory Scientific Officer and holding the following qualification,-

*(a)* shall possesses Chemistry or Biology or Botany or Zoology or Microbiology or Biotechnology or Forensic Science degree from recognized University and Diploma in Medical Laboratory Technology (D.M.L.T.) from a Government recognized institution;

or

Shall possess a degree of Bachelor of Paramedical Technology in laboratory or Bachelor of Science in Paramedical Technology in Laboratory,

*(b)* shall have to pass and complete the six months Hospital Course or Training during probation period;

Or

*(3)* by nomination from amongst the candidates who,-

*(a)* are not less than eighteen years of age and not more than thirty-eight years of age:

Provided that, the upper age limit shall be relaxed upto five years in case of candidates belonging to reserved category:

*(b)* shall possess Bachelor of Science degree from recognized University; and

*(c)* shall have successfully completed the paramedical basic training course conducted by Health and family welfare training centers of the department / Public health institute, Nagpur for the post of multi-purpose health worker or Sanitary Inspector Course approved by health and Family welfare ministry or Sanitary Inspector course approved by the Government of

Maharashtra,

on the basis of the results of the competitive examination conducted by the Selection Committee.

4. Appointment to the post mentioned in rule 3 by promotion from Health Inspector and Laboratory Technician or Laboratory Scientific Officer and nomination shall be made in the ratio of 40: 40: 20, respectively.
5. A person appointed to the post mentioned in rule 3 shall be required to pass the examinations in Marathi and Hindi languages according to the rules made in that behalf, unless he has already passed or has been exempted from passing those examinations. A person shall not be eligible for annual increment or for the promotion, until he passes examinations in Marathi and Hindi language or he has been exempted from passing those examinations.
6. A person appointed to the post mentioned in rule 3 should possess a Certificate in Computer Operations as per the rules prescribed by the Government, from time to time, within the stipulated period, unless he has been exempted therefrom. A person shall not be eligible for annual increment or for the promotion, until he possess such a certificate in Computer Operations as per the rules prescribed by the Government in that behalf or he has he has been exempted therefrom.
7. A person appointed by nomination to the post mentioned in rule 3 shall submit a declaration of Small Family as per the provisions of the Maharashtra Civil Services (Small Family Declaration) Rules, 2005 or any other rules made by the Government in that behalf, from time to time.
8. A person appointed to the post mentioned in rule 3 shall be liable for transfer within the State.

By order and in the name of the
Governor of Maharashtra,

Pradeep Vyas

(Dr. Pradeep Vyas)
Additional Chief Secretary,
to Government.